लोकमत

# लोकस्मृती वसतिगृहास ५१ हजारांची देणगी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागाच्या माजी विद्यार्थ्यांनी लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी ५१ हजार १११ रुपयांची देणगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे शुक्रवारी सुपूर्द करण्यात आली.

प्राणिशास्त्र व रेशीमशास्त्र अधिविभागाच्या १९९७-९९ बॅचमधील माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एकत्र येऊन विद्यापीठात लोकवर्गणीतून साकारण्यात येत असलेल्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहास बळ देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार या बॅचने कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेऊन त्यांच्याकडे निधीचा धनादेश सुपूर्द केला.

'आम्ही आमच्या बॅचच्या वतीने हा निधी कृतज्ञतापूर्वक विद्यापीठास देत असून त्यामध्ये कोणाचेही वैयक्तिक नाव न येता बॅचच्याच नावे हा निधी वापरावा,' अशी विनंती त्यांच्याकडून करण्यात आली आहे.